(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग - ६ करिता)

क्र.पोमसं/५/१०/वेगवर्धित पदोन्नती/३०/२०१७.
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- १४/१२/२०१८.

**वाचा :-** १) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.एनपीसी-१००८/सीआर-६/पोल-३, दि.१५/०७/२०१३, आणि

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीएम्एन्-१०१२/ प्र.क्र.१६५/पोल-५ ब, दि.२०/०५/२०१४.

**आदेश**

राज्यातील नक्षलग्रस्त भागात अत्युत्कृष्ट व वैशिष्टपूर्ण कामगिरी करणाऱ्या नि:शस्त्र सहायक पोलीस उप निरीक्षक यांना लगतच्या वरिष्ठ पदावर म्हणजे नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक पदावर वेगवर्धित पदोन्नती (Accelerated Promotion) देण्याकरिता शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीएमएन-१०१२/११३२/ प्र.क्र.१६५/पोल-५ब, दिनांक २०/०५/२०१४ अन्वये शासनाने आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन वेगवर्धित पदोन्नती समितीसमोर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सहायक पोलीस उप निरीक्षकाने बजावलेली कामगिरी व त्यांनी नक्षल विरोधी अभियानासाठी दिलेले योगदानावर विस्तृत चर्चेअंती नि:शस्त्र सहायक पोलीस उप निरीक्षकाला लगतच्या पदावर वेगवर्धित पदोन्नतीची पात्रपात्रता तपासतांना वेगवर्धित पदोन्नती समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे पात्र ठरलेल्या खालील नि:शस्त्र सहायक पोलीस उप निरीक्षकाला नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक पदावर स्थानापन्न व तात्पुरती (Provisional) वेगवर्धित पदोन्नती देण्यात येत आहे.

२. वेगवर्धित पदोन्नती समितीने घेतलेल्या निर्णयाचे अनुषंगाने पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी सर्वानुमते नि:शस्त्र सहायक पोलीस उप निरीक्षक ते नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक पदात पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या दर्शविलेल्या रकाना क्र.४ मधील घटकांत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | नि:शस्त्र सहायक पोलीस उप निरीक्षकाचे नाव | सध्याची नियुक्ती | पदोन्नतीवरील नियुक्ती |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | मधुकर पोचय्या नेताम | गडचिरोली | गडचिरोली परिक्षेत्र |

३. सदरहू प्रकरणी वर नमूद नि:शस्त्र सहायक पोलीस उप निरीक्षकास पदोन्नतीवर हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच, ते पदोन्नतीवर हजर झाल्याचा दिनांक अभिलेखासाठी त्वरेने या कार्यालयास कळवावा.

३. सदरचे आदेश इंटरनेटरवर **http://www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

४. पदोन्नत झालेले नि:शस्त्र सहायक पोलीस उप निरीक्षकाचे अभिनंदन व शुभेच्छा.

( राजकुमार व्हटकर )
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
**पोलीस महासंचालक यांचेकरिता.**

प्रति,

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
पोलीस अधीक्षक, गडचिरोली.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.४, ९ व २१-अ.
कार्यासन क्र.५ मधील प्रमुख लिपीक.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.

२. सदर आदेश ३० दिवसांसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.